
२२ मार्च २०२०
अरे तू व्हायरस बद्दल ऐकलं आहेस का?
ते सगळं काही बंद करतील का?
फुल्लोबाई ही लालगढमधील ४३ वर्षांची गोंड आदिवासी समाजातील भाजी विक्रेती आहे.
टीव्हीवर लॉकडाउन जाहीर झाल्यानंतर वस्तीमध्ये गोंधळ आणि अंदाधुंदी माजली.
फुल्लो, लॉकडाऊन दरम्यान आपण कसे कमवू आणि काय खाऊ?
फुल्लोबाई तिने साठवलेल्या मिळकतीची खातरजमा करते.
आपल्याकडे ४००० रुपये आहेत पण घरातील रेशन जवळजवळ संपत आले आहे, ते आपल्याला भाजीपाला विकू देतील का?
फुल्लो, तू भाज्या विकायला बाहेर पडू शकतेस. पण मी टेलरिंग काम कसे सुरु ठेऊ?
दीदी, आम्ही काम केले नाही तर सायबू आणि आमचं जगणं मुश्किल होईल.
सायबू हे फुल्लोबाई यांचे पती आहेत. ते आसपासच्या वसाहतींमध्ये कचरा गोळा करण्याचं काम करतात.


२३ मार्च
फुल्लो, बस बंद आहेत, तर तू आज माझी सायकल घेऊन जा.
मी दाईला बाजारापर्यंत घेऊन जायला मदत करेल.
संजय हा फुल्लोबाईचा १४ वर्षाचा मुलगा आहे.
दाई, चल पटकन, चल या रस्त्याने जाऊया. मी या रस्त्यावर पोलिसांच्या गाडीचा सायरन ऐकला आहे.
एवढे रिकामे रस्ते मी कधीच पाहिले नाहीत!
इतर फेरीवाले येथे आहेत. मंदिर आणि मशिदही खुली आहे.
फक्त मोठी दुकाने बंद आहेत.
बाजारच्या चौकात फुल्लोबाईला तिच्या काही सहकाऱ्यांना पाहून हायस वाटलं.
बाजारातील मशिदीबाहेर उभे असलेल्या पोलिसांना फुल्लोबाई पाहते. दरम्यान, मंदिरात आरती सुरू होते.


मशिदीतून बाहेर पडताना ११ जणांना मारहाण आणि अटक होताना फुल्लोबाई पाहते.
STORE
फुल्लोबाईना दिसते की शिपाई पुजारी राम मिश्राला मंदिर बंद करण्यास सांगतात; पण त्याआधी ते देवासमोर हात जोडतात व प्रसाद घेतात.
मंदिरात कोणालाही अटक झाली नाही!
दाई, मंदिरात प्रार्थना करणे काही चूक नाही. त्याशिवाय मशिदीमध्ये ही बरेच लोक होते.
अटक करण्यात आलेल्या मुस्लिमांनी पोलिसांना सोडून द्या अशी विनंती केली आणि लॉकडाऊनच्या नियमांचे पालन न केल्याबद्दल पोलिसांनी त्यांना फटकारले.


मटण विकणाऱ्या आणि फेरीवाल्यांचा पाठलाग करण्यासाठी अधिक पोलीस बाजारपेठेत दाखल होतात.
आम्ही लॉकडाऊनचे नियम तोडणाऱ्यांना भरपूर लोकांना यापूर्वीच अटक केली आहे
आता निघा इथून, नाहीतर आम्ही आमचा दांडा वापरू आणि तुम्हाला जेलमध्ये पाठवू.
फुल्लोबाई आणि संजय घाईघाईने भाज्या एकत्र करत असतानाच, पोलीस मटण विकणाऱ्या अक्रमला अटक करतात.
तुम्ही मला अटक का करत आहात?
कायद्यानुसार तर मटण हे अत्यावश्यक गोष्टींचा भाग आहे!
MEAT
जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले आहे की, फक्त अत्यावश्यक वस्तूंना घरपोच पाठवण्याची परवानगी आहे.
मी घरपोच वस्तू कसं पाठवू शकतो?
साहेब, कृपया आमचा माल सोडा.
*आम्ही निघून जाऊ!*
एका शिपाई फुल्लोबाईच्या भाज्यांची नासधूस करायला सुरवात करतो.


तुला आम्ही अटक केली आहे; लॉकडाऊनचे नियम तोडण्याचे तुझ्याकडे काय कारण आहे?
कृपया, त्याला जाऊ द्या, आम्ही निघतो.
गप्प रहा, कारण तुला मी ताकीद देऊन सोडतोय.
तुम्ही लोक कसलेच नियम पाळत नाही!
व्हायरस आहे तरीही, तुमच्या सुरक्षितेसाठी आम्हाला काम करण्यास भाग पाडले जात आहे!
काय सुरक्षा?! पोलिसांच्या हिंसाचारापासून कोण सुरक्षित आहे?
फुल्लोबाईच्या लक्षात आले की, तंबू दुकानाचा मालक उमाकांत यालाही इशारा देऊन सोडून देण्यात आले आहे.
तुम्ही अत्यावश्यक वस्तूंच्या श्रेणीमध्ये कसे येता?!


मला असं वाटतंय की माझं आज नशीब चांगलं आहे.
आम्ही तुम्हाला चेतावणी देऊन सोडत आहोत. ही पावती ठेवा, ही तुम्हाला ताकीद आहे.


फुल्लोबाई मुख्य रस्त्यावर लोकांची तपासणी करताना पोलिसांना पाहते. काही लोकांना थांबवले आणि बाकीच्यांना सोडून दिले.
पोलीस हे निर्णय कसे घेतात?
STORE


पोलीस सर्व अटक केलेल्या व्यक्तींना ताब्यात घेऊन निघून जातात.
ते संजयला कोठे घेऊन जात आहेत?! या नोटीसचा अर्थ काय बरं आहे?


फुल्लोबाई जवळच असलेल्या पोलीस स्टेशनमध्ये जाते, हे बघण्यासाठी की संजयला तिथे घेऊन गेले आहेत का?.
पोलिसांनी आजच्या भाज्यांची वाट लावली. आत्ता माझ्याकडे फक्त ४००० रुपयेच राहिले, एवढ्याश्या पैशात मी संजयला कशी सोडवू शकते?


फुल्लोबाईला पोलिसांनी चेकपॉईटला थांबविले.
साहेब, मी आई-वडिलांसाठी औषधे खरेदी करायला बाहेर पडलो होतो. कृपया, मला जाऊ द्या.
साहेब, माझा नवरा रोज मला मारहाण करतो. मी बाजूच्या जिल्ह्यात माझ्या आई-वडिलांच्या घरी जाते, नाहीतर मी लॉकडाउनमध्ये जगू शकणार  नाही.
औषधे खरेदी करण्यास गेलेल्या माणसाला आणि नवऱ्याचं घर सोडणाऱ्या महिलेला पोलीस नोटिसा बजावतात.
तुम्ही बाहेर का आला आहात आणि मास्क का नाही घातलेला?
आम्हाला लॉकडाउनची परिस्थिती पाहायची होती.
पोलीस तिन्ही फिरणाऱ्या तरुणांना नोटीसा बजावतात.
फुल्लोबाई बघते की होंडा गाडीवाल्याला जायला परवानगी दिली जाते.
कारला जाऊ द्या, ते किराणा सामान घ्यायला आले आहेत!
सरळ घरी जा, इकडे-तिकडे भटकू नका!


पोलीस फुल्लोबाईची विचारपूस करतात आणि ती त्यांना त्यांची नोटीस दाखवते.
माझ्या मुलाला अटक करण्यात आलेली आहे. कृपया, मला पोलिस स्टेशनमध्ये जाण्याची गरज आहे.


पोलीस नोटीस बजावलेल्या प्रत्येकाला शिक्षा म्हणून उठाबशा काढायला लावतात.
आपल्यापैकी कोणाकडेही लॉकडाउनच्या नियमांचे तोडण्याचे समाधानकारक उत्तर नाही. म्हणून तुम्ही सगळे घरीच राहा.


फुल्लोबाई जवळच पोलीस स्टेशन कशीबशी गाठते.
चालती हो इथून! तुझा मुलगा इथे नाही. सध्या, लॉकडाऊन आहे म्हणून तू घरी निघून जा!


स्टेशनबाहेर काही शिपाई हात धुण्याविषयीचे डान्स व्हिडिओ शूट करत होते.
अजून एकदा, शेवटची काही सेकंद अस्पष्ट दिसत आहेत.



निराश आणि काळजीत असलेल्या फुल्लोबाई घरी परतात.
संजय कुठे आहे?
त्याला अटक झाली.
वस्तीत पण पोलिसांनी अनेक लोकांना अटक केली आहे.
सायबू फुल्लोबाईला सांगतो की पोलिसांनी वस्तीतील पारधी लोकांच्या घरांना लक्ष्य केले आणि माहुआसाठी घराची झडती घेतली. महुआ ही पारंपरिक दारू आहे, ती तयार करून पारधी लोक त्यावर आपला उदरनिर्वाह चालवतात.
सर कृपया, मी २ महिन्यांपूर्वीच दारू विकणं बंद केले आहे!
पोलीस जुगार प्रतिबंध कायद्यानुसार पत्ते खेळणाऱ्या पुरुषांनाही अटक करतात.
जो कोणी घराबाहेर किंवा वस्तीच्या बाहेर पडेल त्याला अटक करण्यात येईल!
फुल्लो रडू नकोस, संजय गोंडी आहे. आपल्या समाजाच्या लोकांसोबत हे नेहमीच असं घडत असतं. मला देखील किरकोळ कारणांवरून अनेकदा अटक झालेली आहे, तरी सुद्धा मी अजूनही येथेच आहे. तो ठीक असेल.


आदिवासींच नशीब इतकं वाईट का आहे? पोलीस आपल्या समाजावरच का डोळा ठेवतात? मी माझ्या मुलाला कधी सोडवू शकेन?
पोलिसांच्या म्हणण्यानुसार लॉकडाऊनच्या नियमांचे उल्लंघन करण्याचे ‘समाधानकारक’ उत्तर काय आहे?! आपण आपल्या कुटुंबाच पोट भरण्या करिता काम करू नये का ?
२० मे
अक्रम परत आला नाही का?
कदाचित तो अजूनही तुरुंगांत आहे, फुल्लोबाईच्या मुलासोबत.
लॉकडाउन उठल्यानंतर फुल्लोबाई बाजारात परत येते.
मी आशा करते की आज आपण सर्वजण पुरेसे पैसे कमाऊ, जेणेकरून उद्या आपल्या कुटुंबाला पोटभर जेवायला मिळेल.
फुल्लोबाई यापुढेही नोटीसाची पावती आपल्या जवळ बाळगत राहते, त्याचा अर्थ काय आहे हे समजल्याशिवाय.